**" प्रेसनोट "** दिनांक :- ३१/०५/२०२४

दक्षिण विभाग सायबर पोलीस ठाणे, गुन्हे शाखा, मुंबई यांनी सायबर गुन्हेगार यांना अनेक बॅक खाते चा पुरवुठा करणारे २ इसमांना नाशिक येथुन अटक करून सुमारे २९ डेबीट कार्ड , २८ खात्यांचे पासबुक वेगवेळया कंपनीचे ८ सिमकार्ड व ८ विविध कंपनीचे फोन हस्तगत केले बाबत

.......................................................................................................................

दिनांक ०२/०५/२०२४ रोजी कुलाबा येथे राहणाऱ्या महिला तक्रारदार यांचे तक्रारीवरून दक्षिण विभाग सायबर पोलीस ठाणे येथे गु.र.नं.४४/२०२४ कलम ४१९,४२०,४६५,४६८,४७१,१२०ब, भा.दं.वि सह माहिती तंत्रज्ञान कायदा ६६क, ६६ड प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला आहे. यातील नमुद फिर्यादी यांना आरोपींनी दि. २८/०२/२४ ते दि.०१/३/२०२४ रोजी कालावधी दरम्यान व्हॉटसअॅप क्रमांक +917827624002, +918807510416, +919619359881,तसेच t.me/pd15680vkf.k , २) @Sabya_1680 , ३) @panditS680 या आय.डी. चा वापर करून फसवणुक करण्याचे इरादयाने फिर्यादीला पार्ट टाइमजॉब करण्याकरीता मॅसेज पाठवुन फिर्यादी यांची १४,२३,०००/- रूपयांची फसवणुक करण्यात आली होती.

गुन्हयाचे तपासादरम्यान आरोपीत यांनी फिर्यादी यांना विविध खात्यांवर पैसे टाकणेस सांगीतले होते त्यापैकी फेडरल बॅकं खात्याचे धारक याचा शोध घेउन पुढिल तपास केला असता खातेधारक हा नाशिक येथील हॉटेल मध्ये वेटर म्हणून काम करीत असुन त्याने त्याचे खाते नाशिक मधिल एका तरूणास वापर करण्यास दिले होते. याबाबत अधीक तपास केला असता आरोपीतानी नाशिक व परीसरातील विविध हॉटेल मध्ये काम करणारे इसम व त्याचे मित्र यांच्या नावाचा वापर करुन अनेक खाते उघडल्याचे व त्याना बॅक खात्याचा वापर करुन अमेरीकन डॉलर खरेदी करुन परदेशातील पाहीजे आरोपीना दिल्याचे निष्पण झाल्याने त्यानो ताब्यात घेवुन अटक करण्यात आली आहे.

**अटक आरोपी यांची नावे,**
१) हिमांशु रविंद्र मोरे वय:- २१ रा. पिएनटी कॉलनी नाशिक, मुळ पत्ता. ओंकार कॉलनी मालेगाव, नाशिक
२) प्रेम दादाजी शेवाळे वय:- १८ रा. पिएनटी कॉलनी नाशिक, मुळ पत्ता:- बॅक कॉलनी मालेगाव , नाशिक
**जप्त मालमत्ता**:- वेगवेगळया बॅकांचे २९ डेबीट कार्ड , २८ बॅक खात्यांचे पासबुक व वेलकम कीट लेटर ,वेगवेळया कंपनीचे ८ सिमकार्ड , ८ विविध कंपनीचे मोबाइल फोन

फिर्यादी यांनी पार्ट टाइम जॉबमध्ये जादा रक्कम कमविण्याचे आमीषापोटी सुमारे १४,२३,०००/- आरोपी यांना पाठविले होते. तरी नागरीकांना आवाहन करण्यात येते की पार्ट टाइम जॉब, गुंतवणुक व इतर जास्त परतावा/पगार मिळवुन देण्याचे आमीषाला बळी पडु नये, व ऑनलाइन फसवणुक झाल्यास १९३० या क्रमांकावर तात्काळ तक्रार करावी.

अशाप्रकारे सायबर गुन्हेगाराना गुन्हे करण्यासाठी लागणारी बॅक खाते पुरविणारी टोळी पकडुन त्याची सर्व खाते गोठवुन सायबर गुन्हेगारी च्या एका टोळीचा बिमोड करण्यास दक्षिण विभाग सायबर पोलीस ठाणे, गुन्हे शाखा, मुंबई यानां यश मिळाले आहे.सदरची चांगली कारवाई मा.पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई श्री. विविक फणसळकर, मा.विशेष पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई श्री. देवेन भारती, मा.सह पोलीस आयुक्त, गुन्हे, मुंबई श्री.लखमी गौतम, मा.अप्पर पोलीस आयुक्त, गुन्हे शाखा, मुंबई श्री.शशिकुमार मिना, मा. पोलीस उप आयुक्त(प्रकटीकरण) श्री. दत्ता नलावडे, मा.सहा.पोलीस आयुक्त, सायबर, गुन्हे शाखा, श्री. अबुराव सोनावणे, वरीष्ठ पोलीस निरीक्षक श्री.नंदकुमार गोपाळे, सहा.पोलीस निरीक्षक दिपक देसले, पो. हवा. मधुकर लहारे, पो.शि. सचिन धोत्रे, पो.शि. नितीन शिंदे यांनी केली.